## प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 3 Issue 11 AUGUST 2011 Rs. 15

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

सध्या उच्च जगात राहणाऱ्या आणि सप्त ऋषी ज्यांचे मुख्याधिकारी आहेत अशा ऋषींचे महर्षी अमर (१९१९–१९८२) हे असामान्य चॅनल होते. प्राचीन ऋषींनी जे ज्ञान या भूतलावर आणले होते त्या ज्ञानात त्यांनी भर घातली. या ज्ञानाच्या साह्याने त्यांनी सर्व सत्य–शोधकांचे मार्गदर्शन केले आणि त्यांनी व्यक्तिशः गोळा केलेल्या नवयुगाच्या शक्ती या सत्य–शोधकांना पुरवल्या. आपल्याला या गोष्टीचा खूप आनंद वाटायला हवा की, त्यांचे वास्तव्य असलेल्या दूरवरच्या एका तारामंडळातून अजूनही ते आपले मार्गदर्शन करीत आहेत. क्वचितच असे थोर आध्यात्मिक गुरू आपल्या पृथ्वीवर येत असतात.

आध्यात्मिक प्रवासात आपल्याला कोणत्याही प्रकारच्या वेदना होत नसतात हे त्यांनी आम्हाला शिकवले आणि त्यांच्या जगण्यातून ते आम्हाला दाखवले. जेव्हा चक्रे जागृत होतात तेव्हा वेदना होत नसतात. जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा वेदना होत नसतात. जेव्हा महान आध्यात्मिक शक्ती आपल्या शरीर यंत्रणेवर कार्यरत असतात आणि जेव्हा आपण वेगाने आध्यात्मिक प्रगती करत असतो, तेव्हा आपल्या वर्तणुकीत कोणत्याही प्रकारचा विक्षिप्तपणा येत नसतो. खरं तर समंजसपणाने सर्वसामान्य जीवन जगणे हे आध्यात्मिक जीवनाचे लक्षण आहे. भारदस्त, वैभवशाली आणि विवेकपूर्ण वर्तन, व्यक्तिमत्त्वातून शांती आणि प्रेमाचे उत्सर्जन या काही गोष्टी एका परमार्थ साधकाची लक्षणे आहेत आणि अर्थातच एका गुरूची सुद्धा ! स्वतः तसे जगून महर्षी अमरांनी हे सर्व आम्हाला न बोलता शांतपणे शिकवले.

मी जर का महर्षी अमरांना भेटलो नसतो, जर का त्यांच्यासारख्या महान आध्यात्मिक गुरूंपाशी शिकलो नसतो तर मी सुद्धा, आता ज्या ढोंगी आणि विदूषक बाबांना इकडे तिकडे पाहतो, त्यांना बळी पडलो असतो. महर्षी अमर आम्हाला येशू ख्रिस्तांच्या या म्हणीबद्दल आठवण करून देत असत : 'माझे वडील अवतरण्यापूर्वी, बरेच ढोंगी धर्मोपदेशक होतील.'

आपल्या गुरूंचे स्मरण करताना त्यांना पूर्णपणे समजून घेणे आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणे, ही त्यांच्यासाठी सर्वात चांगली भेट होईल. २५ ऑगस्ट २०११ या महर्षी अमरांच्या महासमाधी दिनी आपण त्यांचे विशेषकरून स्मरण करू.

मुंबईला झालेले बॉम्ब स्फोट, घोटाळे, राजकीय हेवेदावे आणि अशा सर्व मानव–निर्मित दुर्दैवी घटना साहजिकच आपल्या मनात उपेक्षावाद, निराशा व वैफल्य निर्माण करतात. पण यामुळे आपण हार मानू नये. आपल्याला या दुर्दैवी घटनांच्या पलीकडे पाहायला हवे. आपण नवयुगाच्या शक्तींची व या पृथ्वीवरील प्रकाश कार्यकर्त्यांची जाणीव ठेवायला हवी. आपल्याला या मानवी चुका आणि दुर्दैवी घटनांच्या अंधारापलीकडे नेण्यासाठी एक महान प्रयत्न सुरू आहे. आशेचा एक किरण दिसतो आहे. या वर्तमान जीवनापलीकडे प्रेमयुक्त उज्ज्वल जीवन असेल.

आपल्यापैकी पुष्कळ लोक या संपूर्ण जगाकडे प्रकाश प्रवाहित करीत आहेत. आपल्याला माहीत आहे की प्रकाश त्याचे कार्य करीत आहे. ह्याचे परिणाम हळूहळू आपल्याला दिसतील. मी जर म्हटले की, भ्रष्टाचाराचा नायनाट करण्यासाठी प्रकाश प्रवाहित करा, तर आता लोक मला हसतात. पण मला माहीत आहे, की एक ना एक दिवस प्रत्येकजण प्रकाशामुळे होणाऱ्या या क्रांतिचा साक्षीदार बनेल. ■

**मानसा फाउंडेशन (रजि.)**
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१, ९३४२० ३०२५० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) /**
**तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. २००/–**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट**
**एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



चिक्कगुब्बि येथील नवनिर्मित मारुती मंदिर

### काही ठळक घडामोडी

- २८–८–२०११ रोजी तपोनगर येथे महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्यासाठी २५–८–२०११ पर्यंत नाव नोंदवावे.
- Guruji Speaks - Vol 4", "iGuruji - Vol 5", "New Age Realities" ह्या पुस्तकाचा कन्नड भाषेतील अनुवाद आणि स्टडी सेंटरचे एक पुस्तक – अशी चार पुस्तके २८–८–२०११ रोजी तपोनगर येथे प्रकाशित करण्यात येतील.
- २५–८–२०११ रोजी आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.
- २५–८–२०११ रोजी आनेकल येथे "New Age Realities" ह्या पुस्तकाचा श्रीमती चंपा ह्यांनी केलेला कन्नड भाषेतील अनुवाद प्रकाशित करण्यात येईल.
- तपोनगर व आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात १५–७–२०११ रोजी दुपारी १२ ते १ पर्यंत गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित केलेल्या विशेष ध्यानात दोनशे पेक्षा अधिक ध्यानसाधकांनी भाग घेतला.

### रविवारच्या प्रसादाचे प्रायोजक

| | |
|---|---|
| प्रतिभा नवताके, शांता लक्ष्मीकांत आणि अमित किणी | ०५–६–२०११ |
| हेमा रेड्डी, माधवमूर्ती, शंकर राव पाटदार आणि अंजना गुप्ता | १२–६–२०११ |
| बार्बरा व्हॉन ग्रोटे, शैलजा राव, सुचित्रा वैद्य आणि अंजना गुप्ता | १९–६–२०११ |
| शांता लक्ष्मीकांत, गंगाधरन टी. एस., गौडा श्रीनाथ, विनू वर्गिस आणि सुचित्रा जीवनंदम | २६–६–२०११ |

**रू. २००० देऊन रविवारच्या प्रसादाचे आणि रू. ५००० देऊन वृत्तपत्राचे प्रायोजक आपण होऊ शकता.**

### महर्षी अमर महासमाधी कार्यक्रम
### २८–८–२०११, रविवार

| | |
|---|---|
| सकाळी ११ वाजता | स्वागत |
| | जेष्ठ साधकांचे व्याख्यान |
| | गुरुजींचे व्याख्यान |
| | पुस्तकांचे प्रकाशन |
| | विशेष ध्यान |
| | गुरुजींकडून आशीर्वाद |
| दुपारी १२.३० वाजता | प्रसाद |

### तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत<br>– विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार २१ | – श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विशेष ध्यान मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार २८ | – महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम |

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०७ | रविवार | शुक्लाष्टमी |
| ०८ | सोमवार | शुक्ल दशमी |
| १२ | शुक्रवार | महालक्ष्मी उपासना |
| १३ | शनिवार | पौर्णिमा |
| २१ | रविवार | श्रीकृष्ण जन्माष्टमी |
| २५ | गुरुवार | महर्षी अमरांचा महासमाधी दिवस |
| २७ | शनिवार | शिवरात्री |
| २८ | रविवार | महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम |
| २९ | सोमवार | अमावास्या |
| ३१ | बुधवार | गौरी देवी उपासना |

गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक, शनिवार, १३–८–२०११ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.

## "लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट" बद्दल वृत्तांत

- प्रकाश प्रवहनाचे कार्य शांतपणे वाढते आहे. स्वयंसेवक उत्कटतेने पण शांतपणे त्यांच्या गुरुंचे स्वप्न साकार करण्यासाठी कार्य करीत आहेत. ते स्वप्न आहे, ह्या जगाला शांतीने आणि प्रेमाने परिपूर्ण असलेले पाहणे. शाळांकडून आम्हाला खूप मदत मिळते आहे. एका शाळेने पालक–शिक्षकांच्या भेटीची सुरुवात प्रकाशाचे प्रवहन करून केली.
- जून २०११ मध्ये आपल्या स्वयंसेवकांनी ११४ नवीन शाळांना भेट देऊन ३९००० नवीन विद्यार्थ्यांना प्रकाशाचे प्रवहन करण्यास शिकवले. आता एक लाखापेक्षाही जास्त मुले दररोज त्यांच्या शाळांतून प्रकाशाचे प्रवहन करतात.
- मदुरई येथे एक प्रकाश प्रवहन केंद्र सुरु करण्यात आले आहे आणि बंगलोर येथे आणखी एक केंद्र उघडले आहे. ■

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

प्रकाश प्रवहनामुळे आमच्या विद्यार्थ्यांचा धीर, त्यांची एकाग्रता, सहनशीलता, शिस्त व स्मरणशक्ती या सर्वात सुधारणा झाली आहे. त्यांच्या स्वभावात आणि वर्तनात चांगली सुधारणा आहे.

– बी. जयलक्ष्मी, गव्हर्नमेंट हाय स्कूल, सनीगुरुवनाहळ्ळी, बंगलोर

गणिताचा पेपर सोडवताना शेवटी माझ्या लक्षात आले की माझे आणखी दोन प्रश्न सोडवायचे राहिले होते आणि माझ्याकडे फक्त दोन मिनिटे उरली होती. प्रश्न सोपे होते पण त्यांची उत्तरे लांब होती. मी प्रकाश आणि प्रकाश गुरुंना माझी मदत करण्यासाठी प्रार्थना केली. प्रश्न सोडवल्यानंतर मी जेव्हा घड्याळाकडे पाहिले तेव्हा ते तीच वेळ दाखवत होते, जी प्रश्न सोडवायला सुरुवात करण्यापूर्वी होती! मला खरं तर धक्काच बसला! मला ८५.५% गुण मिळाले, ते केवळ प्रकाश आणि प्रकाश गुरूंमुळे. माझे मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

– ऋचा नाशिककर, विद्यार्थिनी, मुंबई

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

अर्धे वर्ष संपल्याची जाणीव करून देणाऱ्या जून महिन्यात अनेक प्रगती दर्शक घटना घडल्या. महिन्याच्या दुसऱ्या दिवशी सूर्य ग्रहण होते जे प्रकाश युगाची सुरुवात करणाऱ्या दोन प्रगती दर्शक ग्रहणांपैकी पहिले होते. ह्या जोडीने आलेल्या ग्रहणांच्या पंधरवड्यात मारुती मंदिराचे उद्घाटन झाले.

मारुती मंदिराच्या उद्घाटनासाठी, गावकऱ्यांसाठी तीन दिवसांचा धार्मिक विधी आणि त्यानंतर प्रकाशाच्या मार्गाने समूह ध्यान असे दोन समारंभ झाले. समूह ध्यानाच्या दिवशी सप्तर्षी आले आणि मारुतीच्या मूर्तीमध्ये श्री मारुतीच्या अंशाची स्थापना करण्यात आली. गुरुजींनी घोषणा केली की, दर शनिवारी संध्याकाळी ७ वाजता तपोनगरवासी तेथे एकत्र जमून ध्यान करतील आणि त्यात भाग घेण्यासाठी गावकऱ्यांचे स्वागत आहे.

देवळाचे पांढरे शुभ्र उंच गोपुर हिमालयातील हिमाच्छादित भव्य पर्वतांची आठवण करून देते. मारुतीच्या बारा फुटाच्या प्रसन्न मूर्तीच्या दोन्ही बाजूस दोन पाच फूट उंचीच्या पितळी समया आहेत. देवळासमोरील रस्त्यावरून येता जाताना मारुतीचे दर्शन घेता यावे म्हणून गुरुजींनी मुख्य द्वाराच्या रचनेत काचेच्या मोठ्या तावदानांचा वापर केला आहे. देवळाच्या उंच चौथऱ्याकडे नेणाऱ्या पंधरा वळणदार पायऱ्या आहेत. मुख्य द्वारापर्यंतची चढण सुद्धा खूप आल्हाददायक आहे.

गुरुजींनी आमंत्रणे, जेवण, कार्यक्रम इत्यादी सर्व बारीकसारीक गोष्टींकडे स्वत: जातीने लक्ष दिले. त्यांच्या उत्साहाचा प्रभाव आजूबाजूच्या सर्वांवर पडला.

ह्या समारंभ दिनीच्या आधीचे काही दिवस श्री. कृष्णा यांच्यासाठी भरपूर धावपळीचे दिवस होते. ते रविवारचा प्रसाद बनवून वाढणाऱ्या वेंकटम्माचे पती आहेत. ते दोघे तपोनगरच्या आधारस्तंभाचा एक भाग आहेत. ते गुरुजींच्या दैनंदिन गरजांकडे लक्ष पुरवतात आणि दिवसाचे २४ तास तपोनगरचा सांभाळ करतात. ते गावाचे स्थानिक असले तरी गुरुजींसमवेत इथे राहाणारे पहिले रहिवासी आहेत. ह्याचे प्रतीक म्हणूनच की काय, सृष्टीने त्यांना तपोनगराच्या प्रवेशद्वाराशी घर दिले आहे!

ह्या प्रगतीदर्शक घटनांव्यतिरिक्त तपोनगरवासींची परीक्षा घेणारी एक घटना घडली ज्यात ते परस्परांबद्दल जिव्हाळा, एकता व क्षमाशीलता असल्यामुळे आणि आलोचनात्मक दृष्टिकोन न बाळगल्यामुळे यशस्वी झाले.

जून महिन्याने स्वत:चा वारसा जुलै महिन्यास दिला ज्याच्या पहिल्या दिवशीच ग्रहण होते! ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंत:करणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंध:काराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

०५–०६–२०११

केवळ सृष्टीच्या निर्मितीमागेच नव्हे तर प्रकाशाच्या महासागराच्याही मागे एक श्रेष्ठ प्रज्ञा आहे, एक परम अस्तित्व आहे ज्याला आपण ईश्वर म्हणतो. तो आपल्या आत व आपल्या सभोवताली व्यापून राहिला आहे. ह्या तथ्याची जाणीव आपल्याला व्हायला हवी. आपल्या जाणिवेच्या मागेही तोच आहे.

शांत बसा, तुमची जाणीव विस्तारा, तुमचे प्रेम व्यापक करा, मग तुम्हाला 'ते' अस्तित्व जाणवते. त्या अस्तित्वाशी सायुज्य साधल्याक्षणी त्याच्याकडून प्रेमाचा झरा वाहू लागतो. मानवी अंतःकरणातून उमलणारे प्रेम महान, मूल्यवान आणि अप्रतिम असते. परंतु, ईश्वरी प्रेमाचा आपण कधीही अनुभव घेतलेला नसतो. या प्रेमासोबत शक्ती येते, ज्ञान येते व इतरही अनेक गोष्टी येतात. कधीतरी अचानक आपल्याला ह्या रक्षणकर्त्या हाताची जाणीव होते आणि आपल्या लक्षात येते की हा तर आपला आध्यात्मिक पिता आहे, जो आपल्या सर्व जन्मांत आपल्या सदैव सोबत होता, मात्र आपण त्याला कधीच ओळखले नाही. त्याच्या अस्तित्वाचा, एका क्षणाचा अनुभव देखील आपले आयुष्य आमूलाग्र बदलण्यासाठी पुरेसा असतो. हे करून पाहा. फक्त तुम्ही प्रामाणिक व साधे असायला हवे.

अमीबापासून शरीरे उत्क्रांत होऊ लागली तेव्हा निरनिराळ्या लोकांमधून आत्मे आले व त्यांनी ती धारण केली. त्यांनी शरीरांमध्ये सुधारणा केल्या. हे करण्यासाठी बहुधा लाखो वर्षे लागली असावी. आता विकासाची ही प्रक्रिया सुरू ठेवणे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी आपण आपल्या विचार पद्धतीमध्ये, भावना व्यक्त करण्यामध्ये व आपल्या जीवन पद्धतीमध्ये सुधारणा करायला हव्या. नियमित ध्यानसाधना करा. तुमच्या चेहऱ्यावरचे भावच मुळी बदलून जातील.

आपल्यापैकी अनेकांना अनेक अनुभव आले आहेत, पण त्यांचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. असे का व्हावे? या मुद्द्यांवर चिंतन करा. जेव्हा आपल्याला असे प्रश्न पडतात आणि आपण आत्मपरीक्षण करू लागतो तेव्हा आपल्या प्रगतीला आरंभ होतो.

एका स्त्रीने मला सांगितले की ती एका 'भगवानां'कडे गेली होती. त्यांनी तिला सांगितले की तिला आत्मज्ञान प्राप्त झाले आहे. मला एकदा ध्यानाचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यास सांगण्यात आले होते. तुमच्या ध्यानाचे व आत्म–साक्षात्काराचे प्रात्यक्षिक करून दाखविता येईल का? अशा प्रश्नांवर तुम्ही विचार करायला हवा.

माझ्या वाढदिवसाच्या समारंभात केव्हाकेव्हा खूप वृद्ध व्यक्ती व लहान मुले सोबत असलेल्या व्यक्ती आशीर्वाद घेण्यासाठी रांग मोडून पुढे येतात. एका माणसाला या गोष्टीचा राग आला व तो आमच्या स्वयंसेवकांशी व विश्वस्तांशी खूप उद्धटपणे वागला व भांडला. वर्षानुवर्षे साधना केल्यावरही तिचा परिणाम कुठे आहे?

भ्रष्टाचाराविरुद्ध लढा चालू आहे. सुंदोपसुंदी सुरू आहे. हे एका अर्थी फार चांगले आहे.

नवयुगाच्या शक्ती, या पृथ्वीवरच्या अनेक लोकांनी प्रवाहित केलेल्या शक्ती व तीन ग्रहणांच्या मालिके दरम्यान प्राप्त झालेल्या शक्ती ह्या सर्वांमुळे अशी खळबळ उडाली आहे. सत्य हेच आहे की भ्रष्टाचार सर्वत्र आहे. आपण त्याचा मनाने निषेध करू या, ह्यात गुंतलेल्या लोकांना प्रकाश पाठवू या आणि परिस्थिती बदलेल अशी आशा करू या.

ध्यानधारणा साधकाला चिडण्यापासून किंवा आरडाओरडा करण्यापासून थांबवू का शकत नाही? एका माणसाला असे का वाटले की अर्धा तास ध्यान केल्यामुळे त्याला पडसे झाले? मी या गोष्टींविषयी अशासाठी बोलतो की परमार्थनिष्ठा म्हणजे काय ते तुम्हाला समजावे. हे प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवे व वैयक्तिकरीत्या अशा गोष्टी टाळायला हव्या. आपण त्यामधून योग्य बोध घ्यावा पण कोणालाही कधीही दोष देऊ नये व कोणाच्या योग्यायोग्यतेचा निवाडा करू नये. आपल्यापैकी कोणीही परिपूर्ण नाही. आपण खूप सारे प्रेम, खूप सारी सहिष्णुता बाळगू. आपण सर्वांवर प्रेम करू, आपल्या ह्या जगावर प्रेम करू.

१२–०६–२०११

तुम्हाला हे कळावे असे मला वाटते की मी वर्गामध्ये बोलतो त्या प्रत्येक वेळी खूप शक्ती प्रसृत होत असतात. इथे असलेल्या तसेच व्याख्यानाचे थेट प्रक्षेपण पाहणाऱ्या किंवा वेबकास्टचे रेकॉर्डिंग वा डीव्हिडी पाहणाऱ्या प्रत्येकाला त्या मिळतात.

"मी कोण आहे?" ही रमण महर्षींची स्वरूपाच्या शोधाची पद्धती होती. स्वरूपाचा अनुभव घेण्यासाठी आपण बुद्धीच्या स्तरावरून ही पद्धती अनुसरण्यास सुरुवात करून गूढाच्या प्रांतात दाखल झाले पाहिजे. आपण आत्मे आहोत. आपण ऋषींसोबत इथे का आहोत? ध्यानात काही काळ घालवल्यानंतर आपण मधूनमधून स्वतःला विचारले पाहिजे की आपण खरंच प्रगती केली आहे का?, आपल्याला खरंच काही कळलं आहे का? प्रश्न विचारण्यामध्ये थोडा अवधी जाऊ द्या. मग प्रत्येक वेळचे उत्तर अधिक व्यापक असेल, त्यात काही नवीन मुद्दे असतील, नवीन प्रकाश असेल. ह्याला साधना म्हणतात. बौद्धिक व्यायाम, गूढाच्या राज्यातील सफरी सुद्धा साधनेचाच भाग आहेत.

एक माणूस द्विधा मनःस्थितीत होता. त्याला कळत नव्हते की नोकरीच्या मुलाखतीमध्ये असत्य बोलून नोकरी मिळवावी की सत्य बोलावे. त्याने माझा सल्ला विचारला. मी त्याला सांगितले की सत्य बोल, परिणामांची चिंता करू नकोस, ईश्वरावर श्रद्धा ठेव, सत्यावर श्रद्धा ठेव.

ग्रहणांपासून मिळालेल्या नवीन शक्तींनी सर्व स्तरांवर नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. चेतनेमध्ये उत्थान घडून आले आहे. या उत्थानातून मिळणाऱ्या शक्ती, फोटॉन बेल्ट व त्याच्या प्रभामंडलापासून मिळणाऱ्या शक्ती, 'रा' ब्रह्माच्या शक्ती ह्या स्वतःहून आपल्यामध्ये बदल घडवून आणणार नाहीत, कारण आपल्याला इच्छा स्वातंत्र्याचा अभिशाप आहे. त्यामुळे बदलाची निवड आपल्याला करावी लागेल, परिवर्तन आपल्याला घडवावे लागेल. या सर्व शक्ती आपल्याला फक्त संधी देऊ शकतात आणि सूचना करू शकतात.

भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देणाऱ्या माणसांनी सर्व गोंधळ उडवून दिला आहे कारण, त्या सर्वांची अतिशय वैयक्तिक अशी कार्यक्रमसूची आहे. भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा निष्प्रभ ठरला आहे. लढा असो की साधना, आपला जेव्हा त्यात वैयक्तिक कार्यक्रम अनुस्यूत असतो तेव्हा आपल्याला यश मिळत नाही. हे अपयश व्यक्तींचे असते, शक्तींचे नव्हे. प्रकाशाचे कार्य खूप जोरात सुरू आहे, खूप कार्यक्षमतेने सुरू आहे. आमचे प्रकाश प्रवाहित करणे चालूच आहे. आम्ही विवक्षित व्यक्तींकडे, पुढाऱ्यांकडे प्रकाश प्रवाहित करतो.

प्रत्येक जण विशेष आहे, मला अगदी जवळचा आहे, ईश्वराला आणि सर्वांवर देखरेख करणाऱ्या प्रज्ञावंतांना म्हणजेच ऋषींना जवळचा आहे. आपल्या प्रत्येक प्रयत्नाला त्यांचे साहाय्य मिळते. ही गोष्ट आपण ध्यानात घेतली पाहिजे आणि ईश्वराच्या मुलांना शोभेल असे जगले पाहिजे. मला याचा उच्चार करावासा वाटतो कारण, बऱ्याचदा लोक 'स्व'रूपाला नाकारतांना दिसतात. आपल्या सर्वात जवळ असणारी व्यक्ती स्वतः ईश्वर आहे, तो आपल्या आतच आहे. अशा सत्यांवर सतत चिंतन करत राहाण्याने आयुष्य देखणे बनून जाते.

आपल्या सभोवती किती सौंदर्य विखुरले आहे. आकाशाची निळाई अनुभवा, मिटलेली दारे उघडा आणि तुमची जाणीव विस्तारू द्या. तुमच्यातील कुतूहल आणि लहान मूल तुम्ही जिवंत ठेवले पाहिजे. याला आध्यात्मिक जीवन म्हणतात. व्यक्तिगत जीवन तर महत्त्वाचे आहेच, पण तुमच्या सभोवती असणाऱ्या जीवनाबद्दलही तुम्हाला आस्था वाटली पाहिजे. बंगलोरमध्ये

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

मोसमी पावसाने दिलेली ओढ, भ्रष्टाचाराविरुद्ध चाललेली लढाई इ. गोष्टींची तुम्हाला काळजी वाटली पाहिजे.

१९–०६–२०११

आपण इथे येतो, ऋषींसमोर बसतो, जसे आज बसलो आहोत. तर, अशा प्रत्येक वेळी इथे असणाऱ्या सर्वांना तसेच वेबकास्ट पाहाणाऱ्या सर्वांना ऋषींकडून दीक्षा प्राप्त होते. ऋषींच्या उपस्थितीमुळे नेहमीच आपली प्रगती उंचावते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपण या उपलब्धीचा स्वीकार केला पाहिजे. जाणीवपूर्वक प्रगती घडवून आणण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

महर्षी अमरांनी समजावून सांगितल्याप्रमाणे "समादि"चा अर्थ असा होतो : 'प्रारंभी आपण ईश्वराशी एकरूप होतो, आपण ईश्वरासारखेच होतो.' समादि ही अवस्था आहे. कालांतराने कसे कोण जाणे, लोक 'समादि' ऐवजी 'समाधि' या शब्दाचा प्रयोग करू लागले. परंतु, आता आपण तोच शब्दप्रयोग चालू ठेवला पाहिजे कारण, आता चुकीचा शब्द बरोबर म्हणून रूढ झाला आहे. आता तो दुरुस्त करू गेल्यास गोंधळ होईल, कदाचित वादाला तोंड फुटेल. आपल्याला स्वारस्य आहे ते स्वतःची उन्नती साधण्यात व इतरांना उन्नती साधण्यात साहाय्य करण्यात. आपण स्वस्थ बसून या गोष्टींवर विचार करायला हवा.

प्रत्येक साधक प्रकाशाचा स्वाभाविक प्रवाहक आहे. प्रवाहकांची निवड प्रकाश करतो. आपण ध्यान करतो तेव्हा आपल्याला वैयक्तिक लाभ मिळतात आणि त्याद्वारे आपण जगाची व ईश्वराची सेवा करतो. आपण शक्ती प्रवाहित करतो, प्रकाश प्रवाहित करतो आणि शांतीचा प्रसार करतो.

हल्लीच टाइम्स ऑफ इंडिया मध्ये चेतन भगत यांनी उल्लेख केला की 'योगी' कधी रागवू शकत नाही. किती बरोबर आहे त्यांचे मत! 'साधक' कधी रागवू शकत नाही. साधकाच्या अंतःकरणात नेहमी शांतीचा वास असला पाहिजे. त्याची प्रत्येक कृती, प्रत्येक विचार, प्रत्येक भावना दैवी, सुप्रतिष्ठित व उदात्त असली पाहिजे. तुम्ही शांतीपूर्ण असता तेव्हा तुमच्यातून प्रेमाचा झरा वाहतो, तुमच्या माध्यमातून देव बोलतो. लक्षात ठेवा की हिमालयाप्रमाणे भव्य व सामर्थ्यशाली अशा ऋषींचे तुम्ही प्रतिनिधित्व करता.

दिवस अखेरी जेव्हा तुम्ही झोपायला जाता तेव्हा निरुपाधिक असा फक्त एक मानव प्राणी असता, मग प्रत्यक्ष आयुष्यात तुम्ही कोणी अधिकारी, मोठे उद्योगपती, राजा वा राणी का असेनात. त्या वेळी तुम्ही सद्सद्विवेकबुद्धीच्या आरशात स्वतःला न्याहाळा आणि तो दिवस तुम्ही यथार्थतेने जगलात का ते तपासून पाहा. त्या दिवशी तुम्ही आकाशाचा किती अनुभव घेऊ शकलात? मनुष्य प्राणी या नात्याने जीवनाचा अनुभव घेणे हे आध्यात्मिक आहे. काळ सर्वांना, ध्यान न करणाऱ्यांना सुद्धा नवयुगात नेतो आहे.

एका साधकाला सुस्ती येणे वगैरेसारख्या समस्या होत्या आणि त्याला उदासीन वाटत होते. म्हणून तो मानसोपचारतज्ज्ञाकडे गेला. त्या तज्ज्ञाने साधकाला ध्यानसाधना थांबविण्याचा सल्ला दिला कारण, त्याच्या मते साधना हा पलायनवाद आहे म्हणे! अशा समस्यांवर आपणच उपाय शोधले पाहिजेत. तुम्हाला सुस्ती येत असेल तरी चिकाटी सोडू नका. कधी शरीराच्या कलेने घ्या, कधी बळजबरी करा, पण ध्यान करा. हे शक्य आहे.

तुम्ही जर ज्योतिषाकडे गेलात तर त्याचा सल्ला अतिशय प्रामाणिकपणे पाळा. माझ्याकडून त्याचे सांगणे पडताळून घेण्याचा प्रयत्न करू नका.

एका माणसाने मला लिहिले की प्रकाश प्रवहन करताना तो गायत्री मंत्र म्हणतो. प्रकाश प्रवहनाविषयी आमच्या सूचना संपूर्ण, स्पष्ट, प्रत्यक्ष आणि साध्या सुटसुटीत आहेत. त्यात कधीही फेरफार करू नका.

२६–०६–२०११

आपण सत्य शोधक आहोत, साधना हा सत्याचा मागोवा आहे. आपण उगमात पुन्हा मिसळून जातो, सत्याशी एकरूप होतो तेव्हा साधना संपन्न होते. आपण सर्वजण एक विशेष गट आहोत. ५१००० वर्षांतून एकदा आपण ऋषींच्या मार्गदर्शनाखाली एकत्र येतो. आपल्या हे लक्षात असले पाहिजे व आपल्याला ह्या गोष्टीचा अभिमान वाटला पाहिजे.

काही लोक ऋषींच्या कार्यात मदत करायची निवड करतात. जे लोक कार्य सोडून जातात ते विद्यार्थी साधक म्हणून पुन्हा इथे सामील होऊ शकतात. परंतु, ते पुन्हा कार्यात सहभागी होऊ शकत नाहीत कारण, ऋषींनी त्यांच्या जागी काम करण्यासाठी इतर लोकांना घेतलेले असते. सप्तर्षींच्या ह्या केंद्राची स्थापना नेहमी महर्षी अमरांकडून केली जाते, माझ्याकडून व इतर अनेकांकडून हे कार्य पुढे नेले जाते.

ऋषींचे कार्य करण्याची निवड करणाऱ्या लोकांना कोणत्याही जागेबद्दल, किंबहुना कल्पना, तत्त्वज्ञान इ. बद्दल सुद्धा जिव्हाळा उत्पन्न होऊ न देण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. ऋषींसमोर ते सर्वस्व समर्पण करतात. त्यांच्याजवळ वैयक्तिक कार्यक्रमाचा लवलेशही असून चालत नाही. कारण, तसे असल्यास ते हे कार्य करू शकणार नाहीत. तसे जर असले तर ते दुरुस्त करण्यात येते.

तपोनगर ही महान शक्ती आहे. इथे अमूल्य संधी आहेत आणि अजून कितीतरी गोष्टी आहेत. तपोनगरला तुम्ही नेहमी सोबत ठेवू शकता किंवा तपोनगरशी सायुज्य साधून ह्या शक्ती मिळवू शकता. प्रगती करण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी तुम्ही असाल तिथे तुम्हाला संधी उपलब्ध असतील.

२०१२ सालात घडणाऱ्या घटनांचा आपल्यावर कितपत कठोर आघात होणार आहे ते आपल्याला माहीत नाही. विवाह, मुलेबाळे होऊ देणे याविषयीचे निर्णय अतिशय वैयक्तिक असतात आणि ते तुमचे तुम्हालाच घ्यावे लागतील.

'शंबला तत्त्वांचा अभ्यास' हे पुस्तक नुसते हातात धरल्यावर एका स्त्रीला पुष्कळ आनंद झाला. त्यानंतर तिने पाहिले की तिची त्वचा तेजस्वी दिसत होती. हे फार विलक्षण होते. ह्या विशिष्ट पुस्तकातील शक्तींच्या प्रज्ञेच्या ठायी असलेल्या प्रेमाने तिला हा अवर्णनीय अनुभव दिला.

ऋषींकडून मिळालेली एक सूचना अशी आहे: जेव्हाजेव्हा तुम्ही विचारांमुळे विचलित व्हाल तेव्हा तुमचे लक्ष प्रकाशाच्या महासागराकडे वळवा.

आरोग्याची समस्या असलेल्या एका अपरिचित व्यक्तीने मला लिहिले की खुद्द परमेश्वराने देखील त्यांना मदत केली नाही. त्यांना परमेश्वराबद्दल कणभर जरी माहीत असते तर असे भाष्य त्यांनी केले नसते.

आपल्याशी संबंधित प्रत्येक कृती जणू काही नियतीचाच भाग आहे असे समजून फार गांभीर्याने घेण्याची गरज नसते.

आपण असा आग्रह धरू नये आणि कोणाकडून अशी अपेक्षाही करू नये की त्या व्यक्तीने निदान पावती तरी द्यावी की आपण पाठवलेल्या उपचारक शक्तींमुळे त्याला मदत झाली. आपण ध्यानाविषयी त्याला सांगू शकतो, त्याला संधी देऊ शकतो. बस. इतकेच करायचे. ध्यान करणे न करणे सर्वस्वी त्या व्यक्तीवर अवलंबून आहे.

माझी इच्छा आहे की तुमच्यापैकी प्रत्येकाने ऋषींशी, फोटॉन बेल्टशी, 'रा' शक्तींशी व 'रा' ब्रह्माशी संपर्क साधावा. माझ्याकडे कोणी जर अशी विनंती घेऊन आले तर मी ऋषींकडून ज्ञान मिळवून त्यांना प्रशिक्षण देऊ शकतो. संपर्क यशस्वी होण्याकरिता एकच अट आहे : प्रेमाचे खरेखुरे प्रकटीकरण. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- ★ मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## महान गुरू महर्षी अमर

श्यामला देवी, अनुवाद : वैशाली जोशी

महर्षी अमर एक महान गुरू होते ज्यांनी ह्या विश्वाचे महान आध्यात्मिक गुरू असलेल्या सप्तर्षींसोबत कार्य केले. ह्या पृथ्वीवर ५१००० वर्षांतून एकदाच येणाऱ्या या संक्रमण काळात जे एकमेव सप्तर्षी केंद्र उघडले जाते त्याची सुरुवात नेहमी महर्षी अमरच करतात आणि याला पुढे चालवण्याचे कार्य आणखी एक महान गुरू, म्हणजेच आपले गुरुजी करतात.

महर्षी अमरांनी हे जग सोडण्याच्या थोडे दिवस आधी सांगितले होते की, ते आणखी १९ वर्षे जगतील. ते इतक्या लवकर ऑगस्ट १९८२ मध्ये जातील ह्याची कोणाला पुसटशी कल्पना देखील नव्हती. त्यांना समजले होते की, भौतिक स्तरावरचे त्यांचे कार्य, ज्याला अद्याप काही स्पष्ट स्वरूप आले नव्हते ते त्यांना मागे सोडावे लागणार होते. त्या दिवशी गुरुजींनी पाहिले की महर्षी अमर चिंतित होते, जे त्यांच्या नेहमीच्या पठडीत बसणारे नव्हते. गुरुजी म्हणतात की महर्षी अमरांचा मानवी भाग चिंतित होता. त्यांना त्यांच्या कार्यात सहभागी झालेल्या प्रत्येकाशी व्यक्तिशः बोलायचे होते. गुरुजींनी जेव्हा सांगितले की ते त्यांच्या सर्व सूचनांचे पालन करतील तेव्हा महर्षी अमर म्हणाले, "हे पुरेसे नाही. प्रत्येकाने सूचनांचे अनुसरण करावे अशी माझी इच्छा आहे." गुरुजी म्हणतात की महर्षी अमरांचे त्यांनी ऐकलेले हे शेवटचे शब्द होते. महर्षी अमरांचे हे शेवटचे शब्द आपल्या सर्वांसाठी दैवी आज्ञेप्रमाणे आहेत.

महर्षी अमर ह्या पातळीवरून निघून गेले असले तरी ते आपल्यापासून कधीही दूर नाहीत. गुरुजी आपल्याला आणि महर्षी अमरांना जोडणारा दुवा आहेत. गुरुजींकडून येणारे शब्द आणि सूचना महर्षी अमरांचेही शब्द आणि सूचना आहेत. महर्षी अमर गुरुजींच्या मार्फत आपल्यापर्यंत पोहोचतात.

महर्षी अमरांनी आपल्याला भविष्य काळासाठी योग्य ज्ञान आणि मूल्य प्रणाली दिली परंतु ते म्हणाले, "माझे ज्ञान ऋषींकडून मिळालेले ज्ञान आहे." हे ज्ञान त्यांनी गुरुजींसोबत झालेल्या साप्ताहिक बैठकींच्या सत्रांतून त्यांना दिले. नंतर एके दिवशी ते म्हणाले, "आता तुम्ही पतंजलींच्या अष्टांग योगास आणखी एक अध्याय जोडू शकता." ते पुढे म्हणाले, "हे इथेच संपत नाही. जेव्हा नवीन ज्ञान मिळेल तेव्हा हे ज्ञान अद्ययावत करावे लागेल." मानवजातीने प्रेम आणि प्रकाशाच्या नवयुगात प्रवेश करून जगण्यासाठी त्यांनी गुरुजींमार्फत ज्ञानाचे प्रवहन चालू ठेवले आहे. ■

## महर्षी अमर

शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

गुरुजींनी महर्षी अमरांना आपल्या जीवनात आणले आणि त्यांच्यासोबत आल्या नव्या शक्ती आणि नवे ज्ञान. ह्या आपल्याला त्यांच्याकडून मिळालेल्या अनमोल भेटी आहेत. गुरुजी नेहमी आपल्याला महर्षी अमरांबद्दल, त्यांच्या सूक्ष्म जगातील पराक्रमांबद्दल, त्यांची विनयशीलता आणि त्यांच्या मनाच्या विशालतेबद्दल सांगतात. म्हणूनच आपण मानसाच्या सदस्यांनी महर्षी अमरांना बघितले नसले तरी आपल्याला त्यांच्याशी गहन नाते असल्यासारखे वाटते. गुरुजी आपल्याला आणि महर्षी अमरांना जोडणारा दुवा आहेत.

महर्षी अमरांनी आपला परिचय सप्तर्षींशी करून दिला, जे आपल्याला मार्गदर्शन करणारे सूक्ष्म जगातील महान गुरू आहेत. त्यांनी आपल्याला उमजवून दिले की आपण पहिल्यांदा जन्म घेताना खाली ह्या पातळीवर येण्यासाठी मार्गदर्शन करणारे ऋषी तेव्हापासून नेहमीच आपल्या सोबत आहेत. महर्षी अमरांनी सूक्ष्म पातळीवर नि:स्वार्थपणे, मोठ्या प्रेमाने आणि शांतपणे चालू असलेल्या ऋषींच्या प्रचंड कार्याची आपल्याला झलक दाखवली. आता आपल्याला समजले आहे की आपल्या जीवनात शक्तींची खूप मोठी भूमिका आहे आणि ऋषी जगात बदल घडवून आणण्यासाठी वेळोवेळी निरनिराळ्या शक्ती पसरवत असतात.

महर्षी अमरांनी फोटॉन बेल्ट आणि २०१२ मध्ये घडू शकणाऱ्या बदलांविषयी नवीन ज्ञान दिले आहे. ह्या बदलांमुळे नवीन युगाकडे नेणारा हा संक्रमण काळ निराळा आणि महत्त्वपूर्ण असेल. फोटॉन बेल्ट आणि 'रा' लोक, शंबला नगरी यासारख्या निरनिराळ्या स्रोतांपासून नवीन शक्ती पृथ्वीला मिळत आहेत. ह्या शक्ती लोकांमध्ये नवीन जाणिवेचा उदय करतात ज्यामुळे त्यांना प्रकाशाची निवड करून परिवर्तित होण्यासाठी संधी निर्माण होतात आणि त्यांना प्रकाश युगात सहजपणे प्रवेश करण्यासाठी परिवर्तन हाच एकमेव मार्ग आहे ह्याची जाणीव होते.

महर्षी अमरांनी जे काही शिकवले त्याचा अंमल त्यांनी स्वतःच्या जीवनात केला आणि हे त्यांच्या साध्या आणि विशालपणा असलेल्या व्यक्तित्वात प्रतिबिंबित व्हायचे. खूप दूर, दुसऱ्या तारकामंडळात असले तरी ह्या महान गुरूंनी प्रेम आणि प्रकाशाने युक्त असलेल्या प्रकाश युगात नेण्यासाठी अनिर्बंध प्रेम आणि सहनशीलतेने आपले मार्गदर्शन करण्याचे त्यांचे कार्य चालू ठेवले आहे. ■

## प्रश्नोत्तरे

संकलनः शोभा राव, अनुवादः सुनिता देशपांडे

**प्र.** उद्बोधन मिळवणे ही एक सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे का आणि उद्बोधन मिळाल्यावरही ती प्रक्रिया सुरूच राहते का?

**उ.** होय ही एक सतत सुरू राहणारी प्रक्रिया आहे आणि उद्बोधन मिळाल्यावरही ती सुरूच राहते. सर्वच आध्यात्मिक अवस्थांसाठी हे खरे आहे. या मागील मुख्य कारण म्हणजे, इच्छा–स्वातंत्र्य. साधना कधीच थांबत नाही. आपण प्रकाशात विलीन होईपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहते.

**प्र.** सध्या नवयुगासंबंधी ज्या वास्तवांचा उलगडा होत आहे, ती वास्तवे मागील सर्व कालचक्रांमध्येही होती का?

**उ.** नाही. २०१२ साली घडणाऱ्या बऱ्याच घटनांमुळे आणि आपल्या पृथ्वीचा फोटॉन बेल्टमध्ये प्रवेश होत असल्यामुळे, या वेळी हा एक विशेष प्रसंग आहे.

**प्र.** आपण २०१२ सालच्या घटना किती गंभीरतेने घ्यायला हव्यात?

**उ.** आपण या घटनांना आपल्या व्यवहारज्ञानात बसेल इतपतच गंभीरतेने घ्यायला हवे. आध्यात्मिकता म्हणजे नेहमी समंजसपणाने वागणे असते. ह्या गोष्टींची आपण नोंद घ्यायला हवी, त्यांना समजून घ्यायला हवे आणि दक्ष राहायला हवे. आपण आपल्या जीवनात कधीही इतके लक्षणीय बदल करू नयेत की, ज्यांच्यामुळे पुढे आपल्याला पश्चात्ताप करावा लागेल. चांगले व प्रामाणिक बनून, ध्यान करून व सकारात्मक बनण्यासाठी प्रयत्नशील राहून स्वतःला आध्यात्मिकरीत्या तयार करणे, हे सर्वात योग्य होईल.

**प्र.** तपोनगरातील वेगवेगळ्या वास्तूंशी मानसिक संपर्क साधल्याने ध्यानात कसा काय फायदा होतो?

**उ.** तपोनगरातील वास्तूंशी जेव्हा तुम्ही मानसिक संपर्क साधता, तेव्हा तुम्ही त्या वास्तूंमधील शक्तींशी जोडले जाता. तुम्हाला शक्ती मिळतात, कधी कधी ज्ञानही मिळते आणि सर्वसाधारणपणे तुमचे ध्यानही अतिशय सखोल आणि गहन होते.

**प्र.** शंबला तत्त्वांच्या अभ्यासात आणि ध्यान करण्यात काय फरक आहे?

**उ.** दोघांमध्ये सूक्ष्म फरक आहे. ध्यानाची सुरुवात शांततेने होते, आपण समाधीचा अनुभव घेतो आणि आपले परिवर्तन होते. आपण प्रबुद्ध सुद्धा होऊ शकतो. ध्यान हा कमी कालावधीचा सखोल अभ्यास आहे. पण शंबला तत्त्वांचा अभ्यास हा केवळ एक तासाचा अभ्यास नसून ती एक जीवन पद्धती आहे. ध्यानाला शंबला तत्त्वांच्या अभ्यासाची जोड असायलाच हवी पण शंबला तत्त्वांच्या अभ्यासाला ध्यानाची जोड असणे आवश्यक नाही. फक्त शंबला तत्त्वांच्या अभ्यासाने, आपण ध्यानामुळे मिळणारी सर्व फळे मिळवू शकतो.

**प्र.** आपण एखाद्या व्यक्तिवर पूर्णपणे केव्हा विश्वास ठेवू शकतो?

**उ.** तुमच्या अंतःप्रेरणेचा हवाला घ्या. कदाचित जेव्हा तुम्ही विश्वास ठेवता, प्रेम देता, तेव्हा त्याला तसा प्रतिसादही मिळतो. जरी एखादी व्यक्ति विश्वासार्ह नसली तरी आपण जसा विश्वास ठेवतो त्याप्रमाणे ती पण प्रतिसाद देते.

**प्र.** असा कोणता एक अनुभव आहे, जो आपल्यात आमूलाग्र बदल घडवू शकतो?

**उ.** कोणताही अनुभव. प्रत्येकच अनुभव आपल्यात बदल घडवू शकतो पण आपण आपल्यात बदल होऊ दिला पाहिजे. प्रत्येक अनुभव मनात साठवून ठेवा, त्याबद्दल नवल करा, त्याचा पुन्हा पुन्हा अनुभव घ्या आणि त्याचा पाठपुरावा करा. तुम्हाला सुंदर जगांचा उलगडा होईल. समजून घेण्यासाठी आणि नवल करण्यासाठी आपल्याजवळ प्रचंड धीर आणि विनम्रता असायला हवी.

**प्र.** आपण दूरच्या तारामंडळातील लोकांशी कसा काय संपर्क साधू शकतो?

**उ.** प्रकाशाच्या महासागरात, चैतन्याच्या महासागरात प्रवेश करा. ज्या व्यक्तिशी तुम्हाला संपर्क साधायचा आहे, तिचा विचार करा. तिच्याशी तुमचा त्वरित संपर्क होईल. प्रकाशाच्या महासागरात काळ आणि अवकाश लुप्त होतात.

**प्र.** सर्व प्रकारची दुःखं आणि वेदना या पूर्व जन्मातील कर्मांमुळे असतात का?

**उ.** नाही. आपण गतजीवनात जी कर्मे फेडू शकलो नाही, ती कर्मे आपण या जीवनात सोबत घेऊन येतो. पण सर्वच वेदना केवळ गत जन्मातील कर्मांमुळे नसतात. काही वेदना निव्वळ शारीरिक असतात आणि कधी कधी त्या असणे हे नैसर्गिक असते. पुष्कळशा वेदना, या वर्तमान जीवनातील कर्मांमुळे असतात. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आय्‌गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)

द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2010-11
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

## मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

एके रविवारी गुरुजींचे प्रवचन ऐकताना, माझ्या मागे खूप पांढरा प्रकाश असल्याची जाणीव मला झाली. प्रकाशाने मला पूर्णपणे वेढले. मी स्वत:चे शरीर देखील पाहू शकत नव्हते. माझ्या शरीराच्या ठिकाणी मला फक्त पांढरा प्रकाश दिसत होता. मला खूप शांत वाटत होते. त्यानंतर प्रकाशाचे प्रवहन करताना मी प्रकाशात पूर्णपणे हरवून गेले. मी खूप शांतीचा अनुभव घेत होते. मी पृथ्वीमातेशी एकरूप झाले व मी विस्तारित होऊन संपूर्ण विश्वभर पसरत असल्याचा अनुभव मला आला. नंतर मी खूप तेजस्वी शक्तींनी युक्त एका ऋषींना माझ्यासमोर पाहिले. त्यांनी मला आशीर्वाद दिले. या अनुभवामुळे मला खूप बळ मिळाले.

– राखी

ध्यान करताना व कधीकधी इतर वेळी देखील, शक्ती रूपात एका ऋषींचा वास मला जाणवतो. आता तर ते नेहमीचेच होऊन बसले आहे. मला त्यांच्याकडून काही संदेश मिळत आहेत असे मला वाटते. ते मी ऐकण्याचा व खुल्या मनाने ग्रहण करण्याचा प्रयत्न करते. काही वेळा मला असे वाटते की हे संदेश मला एका वेगळ्या पातळीवर प्राप्त झाले आहेत पण या जागृत पातळीवर मला ते उमगत नसावे. असो, पण ऋषींच्या सान्निध्याची जाणीव मला खूप आवडते. खरंच, आपण कधीच एकटे नसतो!

– लिंडा सॉयर

मी ध्यानस्थ होते व शिर्डीच्या साईबाबांशी बोलत होते; त्यांच्याकडे माझ्या आध्यात्मिक प्रगती करिता आशीर्वादाची याचना करत होते. मी त्यांना विचारले, "मला परमेश्वर प्राप्ती कशी होईल?" अचानकपणे मला अगदी वेगळा, एका वृद्ध माणसाचा आवाज ऐकू आला, "ध्यान कर, मी देखील ध्यान करायचो. तुझ्यापेक्षा मी वेगळा नाही. तू म्हणजेच मी व मी म्हणजेच तू."

– ललिता

२७ फेब्रुवारी या दिवशी, साधारणपणे ११.४५ वाजता मी मानसाच्या ध्यानदालनाशी मानसिक संपर्क साधला व थोडा वेळ प्रकाशाचे प्रवहन केले. त्यानंतर मी ध्यानास सुरुवात केली. आदरभावाने स्मरण करण्यासाठी मी डोळे मिटताच मला आकाशी व सोनेरी असे दोन्ही प्रकाशझोत माझ्या डोळ्यासमोर दिसले.

दि. १७ मे च्या रात्री मला स्वप्न पडले. मी स्वत:ला आकाशात इतर लोकांसोबत पाहिले. त्यांनी निळे घट्ट कपडे घातले होते. खाली पांढऱ्या ढगांनी वेढलेले संपूर्ण जग मी पाहू शकत होतो. बरेच लोक ढगांतून बाहेर पडत होते व कोठेतरी जात होते. मला खूप छान वाटत होते व सर्व पाशातून मुक्त झाल्यासारखे वाटत होते. या जगाचे विविध अनुभव दिल्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानत होतो.

– विश्वास दीक्षित

दि. १८ मे रोजी ध्यान करताना, गुरुजी निळसर पांढऱ्या गोलाच्या मध्यात ध्यानस्थ बसल्याचे दृश्य मला दिसले. त्या प्रकाशगोलाच्या तेजस्वी शुभ्र केंद्राबाहेरून प्रेम व प्रकाश, आपल्या गुरुजींकडे प्रवाहित होत होते. प्रकाशाचा एक झोत वरून माझ्याकडे आला. त्यात निळ्या व सोनेरी रंगाचे आत्मे मला दिसले. काही वेळानंतर खूप वेगाने मी आकाशाच्या अनंत विस्तारात फिरलो. मला वाटले की माझे अस्तित्व पंचकोशांत नसून, पंचकोश माझ्यात आहेत. इतकेच नव्हे तर सर्वकाही माझ्यात सामावलेले आहे असे मला वाटले. मला पूर्णपणे मुक्त झाल्यासारखे वाटले.

– रविंदर गौर

दि. २३ मे रोजी सूक्ष्म पातळीवर अगदी आश्चर्यकारक असे काहीतरी घडले. एकप्रकारचा पडदा (टच स्क्रीन) हवेत तरंगत होता. त्या पडद्यात बरेचसे छोटे छोटे भाग होते. त्या प्रत्येक भागांमध्ये वेगवेगळ्या घटना घडत असल्याचे चित्र दिसत होते. ते रंगीत चित्रपटासारखे भासत होते. मी त्या पडद्यावरचे छोटे छोटे भाग वेगळ्या क्रमाने लावत होते, मला वाटले की जणूकाही मी त्या घटनांचा क्रमच बदलत आहे. हे कार्य, या कामात तरबेज असणाऱ्या एखाद्या व्यावसायिकाप्रमाणे मी हाताळत होते. मी खरंच आश्चर्यचकित झाले कारण अशा गोष्टीबद्दल मी यापूर्वी कधीही वाचले नव्हते, ऐकले किंवा असे काही पाहिले नव्हते.

– विद्या विश्वामित्र

माझ्या मनातील प्रश्न गुरुजींना विचारण्याबाबत, मी विचार करीत होते. त्यावेळी मला माझ्या सर्वांगात, विशेषत: हृदयात प्रेमाच्या स्पंदनांची जाणीव झाली. माझा प्रश्न आपोआपच विरघळून, त्याची जागा प्रेमाने घेतल्याचे मला जाणवले. त्या प्रश्नाचे उत्तर प्रेमळ शक्तीच्या स्वरूपात माझ्या अंतरंगात सामावले. माझ्या डोळ्यांतून अश्रु ओघळू लागले आणि ती प्रेमळ भावना माझ्या सोबत दिवसभर राहिली.

– प्रगती राज

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande